"महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम"
तंटामुक्त गांव पुरस्कारासाठी पात्र गांवाची
यादी घोषित करणेबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांक तंमुगां: १००८/सीआर- ५०/पोल-१५,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक :- १९ सप्टेंबर, २००८.**

**वाचा:-** १) शासन निर्णय क्रमांक तंमुगां: १००८/सीआर- ५०/पोल-१५, दिनांक ९ ऑगस्ट, २००८.
२) शासन निर्णय क्रमांक तंमुगां: १००८/सीआर- ४३/पोल-१५, दिनांक १४ ऑगस्ट, २००८.

**शासन निर्णय:-** संदर्भाधीन दिनांक ९ ऑगस्ट, २००८ च्या शासन निर्णयान्वये महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेंतर्गत सन २००७-०८ या वर्षात पुरस्कारासाठी पात्र तंटामुक्त गावे घोषित करण्यात आली आहेत. त्यानुसार राज्यातील २३०९ गावे तंटामुक्त गाव पुरस्कारासाठी पात्र ठरली असून त्यातील २४८ गावे २०० गुणांपैकी १९० गुण किंवा त्यापेक्षा अधिक गुण प्राप्त करुन शांतता पुरस्कारासाठी पात्र ठरली आहेत. काही जिल्हयांच्या बाबतीत जिल्हाबाहय मूल्यमापनाच्या प्राप्त अहवालात टंकलेखन दोष, त्रुटी यामुळे व स्वयंमूल्यमापनाचा अहवाल विहित मुदतीत सादर न झाल्याने पुरस्कारासाठी निर्धारित निकष पूर्ण करणा-या गावांचा समावेश उक्त यादीत झालेला नाही. तसेच लातूर जिल्हयातील ३ गावांच्या बाबतीत जिल्हाबाहय मूल्यमापनाबाबत तक्रारी प्राप्त झाल्याने त्या गावांचे दुस-या जिल्हयातील जिल्हाबाहय मूल्यमापन समितीकडून पुनर्मूल्यमापन करण्यात आले आहे. त्यानुसार धनेगांव, ता.लातूर हे गाव पुरस्कारासाठी पात्र ठरले आहे. बोरी, ता.लातूर हे गांव उक्त दिनांक ९ ऑगस्ट, २००८ च्या शासन निर्णयात तंटामुक्त गाव पुरस्कारासाठी घोषित करण्यात आले होते. पुनर्मूल्यांकनानुसार सदर गाव शांतता पुरस्कारासाठी पात्र ठरत असल्याने सदर गावास रु.४,००,०००/- ऐवजी रु.५,००,०००/- पुरस्कार घोषित करण्यात येत आहे. संबंधित जिल्हयांच्या बाबतीत प्राप्त अहवालानुसार १२ गावे तंटामुक्त गाव पुरस्कारासाठी पात्र ठरत आहेत. शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार सोबतच्या परिशिष्ट-अ येथे दर्शविण्यात आल्यानुसार १२ गावे तंटामुक्त गाव पुरस्कारासाठी पात्र म्हणून घोषित करण्यात येत आहेत. या १२ गावांपैकी १ गाव १९० पेक्षा अधिक गुण प्राप्त करुन शांतता पुरस्कारासाठी पात्र ठरत असून उपरोक्त बोरी, ता.जि. लातूर हे गाव शांतता पुरस्कारासाठी पात्र ठरत आहे. त्यामुळे सन २००७-०८ च्या मोहिमेत उपरोक्त दिनांक ९ ऑगस्ट, २००८ च्या शासन निर्णयात घोषित करण्यात आल्यानुसार २३०९ + १२ अशी एकूण २३२१ गावे तंटामुक्त गाव पुरस्कारासाठी पात्र ठरत आहेत. त्यातील २४८ + २ अशी एकूण २५० गावे शांतता पुरस्कारासाठी पात्र ठरत आहेत. सन २००१ च्या जनगणनेप्रमाणे गावाच्या लोकसंख्येनुसार उक्त १२ गावांना मिळालेल्या पुरस्काराची रक्कम गावाच्या नावासमोर सदर शासन निर्णयातील परिशिष्ट-अ येथे दर्शविण्यात आली आहे.

२. पुरस्काराच्या रकमेच्या विनियोगाबाबत संदर्भित दिनांक १४ ऑगस्ट, २००८ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेल्या आदेशानुसार पुरस्कार रकमेचा विनियोग करण्यात येईल.

३. प्रत्येक जिल्ह्यातील पुरस्कार पात्र गावांना अनुज्ञेय ठरणाऱ्या पुरस्काराच्या रक्कमेइतक्या तरतुदींचे जिल्हानिहाय वितरण पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे करतील.

४. जिल्हा पोलीस अधीक्षक संबंधित जिल्ह्यातील पुरस्कार पात्र गावांच्या पुरस्काराच्या रक्कमेचे धनादेश तयार करतील आणि गावनिहाय त्याचे वितरण करतील.

जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी
शाखा- RC
आवक क्र.
17 NOV 2008
५४८६४

५. महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेअंतर्गत तंटामुक्त गाव पुरस्कारासाठी होणारा खर्च रु.२३,५०,०००/- (रुपये तेवीस लाख पन्नास हजार फक्त) मागणी क्र.बी-१, प्रधान लेखाशीर्ष- २०५५-पोलीस, (००) (१०९)-जिल्हा पोलीस (००) (१०) तंटामुक्त गाव मोहिम (२०५५-०५३ ३),३१, सहायक अनुदान, (योजनेत्तर/दत्तमत) या खालील मंजूर तरतुदीतून करण्यात यावा.

६. सदर प्रयोजनार्थ काढावयाची देयके ही महाराष्ट्र कोषागार नियम नमुना क्रमांक - ४४ मध्ये सादर करुन यासाठी लागणारी रक्कम आहरित करावी.

७. हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. प्र.क्र.३३१/व्यय-७, दिनांक ५/८/२००८ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय राज्य शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २००८०९१९१८१५०७००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

( मा. आ. गुट्टे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग.

प्रति,

मा.राज्यपाल यांचे सचिव,
मा.मुख्यमंत्री यांचे सचिव,
मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव,
सर्व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्यातील सर्व मा. लोकसभा/राज्यसभा सदस्य,
सर्व मा.विधानसभा/विधानपरिषद सदस्य (पत्राद्वारे),
मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
सर्व पालक सचिव, मंत्रालय, मुंबई,
सर्व विभागीय सचिव, मंत्रालय, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व पोलीस अधीक्षक,
सर्व उप विभागीय अधिकारी (जिल्हाधिकारी यांचेमार्फत),
(यांना विनंती करण्यात येते की, सदर शासन निर्णयाच्या छायांकित प्रती आपल्या नियंत्रणाखालील प्रत्येक मंडळ अधिकारी, तलाठी, पोलीस पाटील यांना पोहचविण्याची व्यवस्था करावी.)
सर्व उप विभागीय पोलीस अधिकारी (पोलीस अधीक्षक यांचेमार्फत).
(यांना विनंती करण्यात येते की, सदर शासन निर्णयाच्या छायांकित प्रती आपल्या नियंत्रणाखालील प्रत्येक पोलीस ठाणे, संबंधित ग्रामपंचायत, यांना पोहचविण्याची व्यवस्था करावी.)
सर्व गटविकास अधिकारी (मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. यांचेमार्फत).
सर्व तहसीलदार (जिल्हाधिकारी यांचेमार्फत).
निवड नस्ती (पोल-१५).

## परिशिष्ट-अ

(शासन निर्णय, क्रमांक तंमुगा १००८/सीआर-५०/पोल-१५, दिनांक १९ सप्टेंबर, २००८.)

| अ. क्र. | जिल्हयाचे नाव | तालुका | पोलीस ठाणे | गावाचे नाव | लोक संख्या | पुरस्कारा-साठी पात्र | शांतता पुरस्कारा-साठी पात्र | पारितोषिकाची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सांगली | पलुस | पलुस | सूर्यगाव | १२१० | पात्र | -- | २,००,०००/- |
| २ | | जत | जत | प्रतापपूर | ९६७ | पात्र | -- | १,००,०००/- |
| ३ | नंदूरबार | नंदूरबार | नंदूरबार | नारायणपूर | १०९१ | पात्र | -- | २,००,०००/- |
| ४ | वर्धा | वर्धा | सेवाग्राम | चितोडा | ३००० | पात्र | -- | ३,००,०००/- |
| ५ | | | | इंजापूर | १२५० | पात्र | -- | २,००,०००/- |
| ६ | | | पुलगाव | दहेगांव (स्टेशन) | १२०० | पात्र | -- | २,००,०००/- |
| ७ | पुणे | आंबेगाव | मंचर | मेंगडेवाडी | १५३६ | पात्र | पात्र | २,५०,०००/- |
| ८ | | | | देवगाव | ७६७ | पात्र | -- | १,००,०००/- |
| ९ | | | | शेवाळवाडी | १३४४ | पात्र | -- | २,००,०००/- |
| १० | | | | भराडी | १७०२ | पात्र | -- | २,००,०००/- |
| ११ | | | | भावडी | १२७२ | पात्र | -- | २,००,०००/- |
| १२ | लातूर | लातूर | लातूर | धनेगाव | १८७० | पात्र | -- | २,००,०००/- |
| | | | | | | | एकूण - | २३,५०,०००/- |

------